## नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, ८ वा मजला, बेलापूर भवन सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक २९/०१/२०१३.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **फेब्रुवारी महिन्याची सर्वसाधारण मासिक सभा, मंगळवार, दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता** नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, सी.बी.डी., बेलापूर येथील ७ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊसभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**१. प्रश्नोत्तरे.**

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

२. नमुंमपासाठी वाहनावर बसविलेले उच्च क्षमतेचे सक्शन व जेटींग युनिट (रिसायकलर) वाहने भाडेतत्वावर पुरवठा करणे, वाहनाचे प्रचालन करणे. (२ वाहने)

३. घणसोली, सेक्टर-६, भु. क्र. १७ येथे महिला सक्षमीकरण केंद्र बांधणे.

४. चौथा महाराष्ट्र वित्त आयोगास नवी मुंबई महानगरपालिकेची माहिती सादर करणे.

**ठरावाच्या सूचना :**

**५ व ६. सौ. राधा भुवन ठाकुर, यांजकडून :-**

(५) प्र. क्र. ८५, सेक्टर १४ येथील निमंत्रण हॉटेल ते बिला विस्टा पर्यंतच्या पदपथ व इंटर लॉक बसविणे. (६) प्र. क्र. ८५, दिवाळे गांव येथील समोरच्य रस्त्याच्या लगतच्या गटाराची दुरुस्ती व पदपथला इंटर लॉक बसविणे.

**७ ते ९. सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**

(७) प्र. क्र. २१ अंतर्गत अर्जुनवाडी येथील नाल्याला संरक्षक भिंत बांधणे. (८) प्र. क्र. २१ येथील उर्वरित अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. (९) प्र. क्र. २१ अंतर्गत उर्वरित ठिकाणी पदपथ, पावसाळी गटारे बांधणे.

**१० ते १२. श्री. बाळकृष्ण चाहू पाटील, यांजकडून :-**

(१०) प्र. क्र. २०, मध्ये नोसिल नाका येथे वृध्दांसाठी विरंगुळा केंद्र बांधणे. (११) प्र. क्र. २०, मधील सिध्दार्थनगरमध्ये नगरपालिकेच्या पडीक जागेमध्ये समाजमंदिर बांधणे. (१२) प्र. क्र. २०, मधील तळवली गावामध्ये नवीन सुशोभित व्यायाम शाळा बांधणे.

**१३ ते १५. श्री. सुरेश शंकर भिलारे, यांजकडून :-**

(१३) नवी मुंबई येथील उरणफाटा पामब्रिज रोड येथील लवकरात लवकर गतीरोधक बसविणे.(१४) ऐरोली शहरामध्ये वाशी शहरप्रमाणे, ऐरोली येथे नाटयगृह, खेळाच्या मैदानामध्ये इनडोअरगेम, तरणतलाव, सारख्या सार्वजनिक सुविधा मिळाव्यात. (१५) ऐरोली से.८ येथील नमुंमपाचे क्रांतीवीर नानासाहेब पाटील उद्यानामध्ये जॉगींग ट्रॅक, नाना-नानी पार्क, लहान मुलामुलींची खेळणी, वाचनालय, यासारख्या सुविधा उपलब्ध करुन देवून सुशोभिकरण करणे.

**१६ ते १८. श्री. विजयानंद शंकर माने, यांजकडून :-**

(१६) प्र. क्र. ३०, नार्थपाईंट शाळेसमोर महानगरपालिकेचे मैदान व प्रायव्हेट बिल्डर यांनी घेतलेल्या मैदानावर डेब्रिजचे साम्रज्य वाढलेले आहे. सदर बिल्डर त्या ठिकाणी कोणत्याही उपाययोजना करत नाही व महानगरपालिका सुध्दा करत नाही. सदर ठिकाणी डेब्रिज हटवुन त्या ठिकाणी खेळाचे मैदान करणे. (१७) प्र. क्र. ३०, कोपरखैरण येथील रा.फ.नाईक चौकानंतर गुलाब सन्स डेरी चौकात खुप वर्दळ असते त्यामुळे अपघात भरपूर होतात महासभेमध्ये भरपुर होतात महासभेमध्ये ठराव मांडुन भुयारी मार्ग किंवा स्काय वॉकची ठराव मंजुर करुन घेतला आहे. तसेच तीन टाकी सेक्टर ६ चौक या ठिकाणी देखिल भुयारी मार्ग अथवा स्काय वॉक बांधणे. (१८) प्र. क्र.३०, सेक्टर ३ किंवा ६ येथे कुस्तीच्या आखाडयासाठी ठराव मंजुर करुन घेतला होता.तसेच २०१०-११ च्या अर्थसंकल्पामध्ये याची तरतुद सुध्दा करण्यात आली होती. सदर मैदान नसल्याचे कारण सांगुन हे प्रलंबित ठेवले आहे. तरी लवकरात लवकर कुस्तीचा आखाडा व व्यायाम शाळा बांधणे.

**१९ व २०. सौ. शैला जयाजी नाथ, यांजकडून :-**

(१९) हिमोफिलिया आजाराने पिडीत रुग्णाकरिता नमुंमपाच्या हॉस्पीटलमध्ये एक वॉड मिळावा तसेच या आजारावरती इतर राज्यांप्रमाणे आपल्या राज्य सरकारणे मुंबईमध्ये अशा प्रकारचे घटक (फॅक्टर्स) निशुल्क मिळावे. (२०) रक्तदाब, कर्करोग, हृदयरोग, मधुमेह त्यापासुन किडणीचे आजार असे अनेक रोग आहे. त्यावर उपाय बँडेड औषधांना पर्याय ठरलेल्या स्वस्त आणि विश्वासह जेणेरीक औषधांचे दुकान प्रारुप स्वरुपात आपल्या UHP/MCH/ FRU मध्ये सुरु करण्यात यावे. याकरिता जेणेरिक औषधांना अनुकूल कायदे संमत करण्याच्या पार्श्वभुमीवर मुंबई, पुणे, सोलापूर, नाशिक आदि जिल्हाप्रमाणे जेणेरिक आपल्या नमुंमपामध्ये सुरु करणे.

**२१ ते २३. श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून :-**

(२१) प्र. क्र. ६५, जुईनगर, सेक्टर २२, २३, २४ व २५ येथे तिर्थक्षेत्र करण्यासाठी सिडको महामंडळा कडुन भुखंड हस्तांतरण करुन घेणे. (२२) प्र. क्र. ६५, जुईनगर, मधील रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाण पुल बांधणे. (२३) प्र. क्र. ६५, जुईनगर, येथील नमुंमपा शाळा क्र.१७ च्या इमारतीवर वाढीव बांधकाम करणे.

**२४ ते २६. श्री. बहादुर त्रिलोक सिंह बिस्ट, यांजकडून :-**

(२४) नमुमपा क्षेत्रातील झोपडपट्टी विभागात खाजगी सहभागातुन बांधण्यात येणा-या शौचालयास नमुंमपातर्फे शौचालय करिता बांधण्यात येण्या-या खर्चाचे खाजगी सहभागातून जे शौचालय बांधण्यास येणा-या खर्चाचे त्यांना ५० टक्के अनुदान नमुंमपातर्फे देणे. (२५) नमुंमपाच्या आस्थापनाव्दारे होणा-या नोकरभरती मध्ये ५० टक्के नवी मुंबईतील करदाताकरिता राखीव जागा ठेवणे. (२६) प्र. क्र. ५ मध्ये एम आय डी सी रोड ते इलठण स्मशानभूमी पर्यंत येण्याजाण्यासाठी कच्चा रस्ता आहे. सदर कच्चा रस्ता मालकी हक्काचे असल्याकारणाने तेथे नमुंमपाव्दारे रोड बनविण्यास (डांबरी) अडथळा निर्माण होत आहे. सदर जागा मालकाकडुन विकत घेऊन लोकाच्या सुविधा करिता डांबरी रोड बनविणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**
**सही/-**
**(चित्रा बाविस्कर )**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक २९ जानेवारी २०१३.**